# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
दूरध्वनी क्र. (०२२) २२१६ ३९ ६४ / ६५ / ६९, फॅक्स क्र. : (०२२) २२१६ ३९ ७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in /www.merc.gov.in


जाहिरात क्र. १४/२०१३-१४

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (क्यु बी पी एल) या प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांकरिता विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ वर जनतेकडून सूचना व हरकती मागविण्याबाबत**

मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (पूर्वीची डीएलएफ आकृती इन्फो पार्क्स (पुणे) लि.) यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक व उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे, येथील विशेष आर्थिक क्षेत्राकरिता ''विकासक'' म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (एसइझेड अधिनियम) कलम ४ च्या उप-कलम (१) नुसार, मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड हे, भारत सरकारच्या एसइझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता, एक मानीव वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने सन २०१३ च्या प्रकरण ३८ मधील दि. ३१ ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशाने मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. क्वॅड्रॉन बिझिनेस पार्क लिमिटेड (क्यु बी पी एल) च्या प्लॉट क्र. २८, राजीव गांधी इन्फो टेक पार्क, फेज-२, हिंजेवाडी, पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवांकरिता विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१४ चे प्रारुप तयार केले आहे. सदर प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.mercindia.org.in** किंवा **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. आयोग सदर प्रारुप विनियमांवर या जाहीर सूचनेद्वारा जनतेकडून/हितसंबंधितांकडून सूचना/हरकती मागवित आहे. सदर सूचना/हरकती (१+५) सहा प्रतींमध्ये आयोगाचे सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ (फॅक्स - ०२२-२२१६३९७६; ई-मेल **mercindia@merc.gov.in**) यांना ३१ जानेवारी, २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

आयोगाला ३१ जानेवारी, २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येतील.

**ठिकाण : मुंबई** — **सही/-**
**दिनांक : ४ जानेवारी, २०१४** — **सचिव, मविनिआ**

**Size : 10 (W) x 14 (H) = 140 SQC**